श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-७, अंक-७ | जुलै-२०१९ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ८ |

## किशोरवयीन आरोग्य आणि पोषण केंद्राचे उद्घाटन

भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात 'किशोरवयीन आरोग्य आणि पोषण केंद्रा'चे उद्घाटन प्रमुख विश्वस्त श्री. अशोक रघुनाथ जोशी यांच्या शुभहस्ते दि. २२/६/२०१९ रोजी करण्यात आले. सन २००१ पासून हे रुग्णालय किशोरवयीन मुली, गर्भवती महिला, माता आणि बालकांच्या आरोग्याशी संबधित विषयावर काम करत आहे. या क्षेत्रातील रुग्णालयाने केलेले मोठे काम पाहून 'मेडिकल रिसर्च कौन्सिल, साउथहॅम्प्टन, यूके' (Medical Research Council (MRC) unit of Southampton, UK) आणि 'राजीव गांधी विज्ञान आणि तंत्रज्ञान' (RGST- Rajiv Gandhi Science and Technology) यांच्या सहयोगाने भ.क.ल.वालवलकर रुग्णालय संशोधन-अभ्यास प्रकल्प राबवीत आहे. या प्रकल्पात खालील विषयांवर संशोधन व अभ्यास सुरू आहे.

१) 'सब सहारन आफ्रिका' व भारतातील किशोरवयीन अवस्थेतील पोषण आणि आरोग्य (Collaborative network for adolescent nutrition and health in sub-Saharan Africa and India.

२) किशोरवयीन मुले- भविष्यातील संभाव्य मधुमेहाग्रस्त आणि आरोग्यविषयक दृष्टिकोनातून पूर्वानुमान (डेरवण संघ) The harbinger of future Diabetes-An Adolescent and preconception Health Perspective (Dervan cohort).

या कार्यक्रमाला हॉस्पिटलचे डॉक्टर्स व इतर कर्मचारी उपस्थित होते.




*'किशोरवयीन आरोग्य आणि पोषण केंद्रा'चे उद्घाटन*

# श्रीमती भूषणा अरविंद करंदीकर यांची रुग्णालयाल भेट

दि. १६/०५/२०१९ रोजी श्रीमती भूषणा अरविंद करंदीकर यांनी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयाल भेट दिली. श्रीमती करंदीकर यांनी 'गोखले इन्स्टिट्युट ऑफ पॉलिटिक्स ॲण्ड इकॉनॉमिक्स्, पुणे'मधून अर्थशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी मिळविल्यानंतर त्या महाराष्ट्र राज्य शासकीय सेवेमध्ये सामील झाल्या. महाराष्ट्र राज्य कृषी विपणन मंडळाच्या साहाय्यक संचालक म्हणून त्यांनी काम केले आहे. नवीनतम तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांची ताजी बागायती उत्पादने युरोपियन बाजारात निर्यात करण्यासाठी त्यांनी विशेष काम केले. त्यांनी महाराष्ट्रात 'व्हॅट' व 'विक्री कर' विभागातही सदस्य म्हणून काम केले आहे. २००८ पासून त्या अन्न सुरक्षा, अन्न बाजार, शेतकऱ्यांच्या संघटना या क्षेत्रात कार्यरत आहेत तसेच 'आयएफपीआरआय','हार्वेस्ट प्लस' सारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये स्वतंत्र संशोधक म्हणून काम करीत आहे. श्रीमती करंदीकर यांनी किशोरवयीन मुलींसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. रुग्णालयाच्या कामकाजाविषयीही त्यांनी समाधान व्यक्त केले.



*(उजवीकडून) अंजली गणपुले, भूषणा करंदीकर, डॉ. सुवर्णा पाटील आणि चारुदत्त जोगळेकर*

# डॉ. निशिगंधा नाईक यांची वालावलकर रुग्णालयाला भेट



*डॉ. सुवर्णा पाटील आणि डॉ. निशिगंधा नाईक*

'हाफकिन इन्स्टिट्युट फॉर ट्रेनिंग, रिसर्च ॲंड टेस्टिंग, मुंबई'च्या संचालिका आणि बायोकेमिस्ट्री विभाग आणि विषशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. निशिगंधा नाईक यांनी दि. २२/०६/१९ रोजी भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाल भेट दिली. भारतातील सर्पदंशचे निदान आणि उपचार करण्यासाठी राष्ट्रीय विषुववृत्त संशोधन केंद्राने प्रशिक्षण, संशोधन आणि चाचणीसाठी हाफकिन इन्स्टिट्युटपुढे प्रस्ताव मांडला आहे. त्याकरिता हाफकिन इन्स्टिट्युट देशभरातील विष मॅपिंग आणि सर्पविषाची उपलब्धता सुधारण्याचे नियोजन करीत आहे. या संदर्भात श्रीमती नाईक यांनी रुग्णालयाला भेट देऊन पाहणी केली.

# सावंतवाडी येथे नेत्र तपासणी शिबिर

भ.क.ल. वालावलकर रुग्णालयातर्फे फक्त रत्नागिरी जिल्ह्यातच नव्हे तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातही विविध शिबिरांचे आयोजन केले जाते. दि. १२ आणि १३ जून रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यात, सावंतवाडी व बांदा या गावात 'नेत्र तपासणी शिबिरा'चे आयोजन करण्यात आले होते. या दोन दिवसांच्या शिबिरात २०० रुग्णांची तपासणी करण्यात आली आणि ५० रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी भ.क.ल. वालावलकर रुग्णालयात पाठविण्यात आले. मोतीबिंदूच्या या शस्त्रक्रिया मोफत केल्या गेल्या तसेच त्यांना सावर्डे स्टेशनपासून हॉस्पिटलपर्यंत वाहतूक सेवाही दिली गेली.



# ‘बेसिक लाईफ सपोर्ट’ कार्यशाळा

शनिवार, दि. ८ जून २०१९ रोजी भ.क.ल.वालावलकर रुग्णालयामध्ये ‘बेसिक लाईफ सपोर्ट कार्यशाळा’ आयोजित करण्यात आली होती. पुण्यातील डॉ. मंदार अक्कलकोटकर यांनी कार्यशाळेत सहभागी हॉस्पिटलचे कम्युनिटी विभागाचे कर्मचारी आणि नर्सिंग कॉलेजचे कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत हृदयविकाराची चिन्हे, लक्षणे आणि त्याची ओळख पटविण्याविषयी माहिती तसेच ‘चोकिंग’(गुदमरणे)ची लक्षणे डॉ. अक्कलकोटकर यांनी समजावून सांगितली. ‘सी.पी.आर.’- कार्डिओ पल्मनरी रेससीटेशन (CPR-Cardio-Pulmonary Resuscitation) म्हणजे काय, ‘सी.पी.आर.’ कधी करावा याविषयी माहिती देऊन त्यांनी ‘सी.पी.आर.’ची प्रक्रिया प्रात्यक्षिकाद्वारे शिकवली. कार्यशाळेत सहभागींची एक चाचणी परीक्षा घेण्यात आली. उत्तीर्ण झालेल्या सहभागींना प्रमाणपत्र देण्यात आले. यापुढेही रुग्णालयामध्ये अशा प्रकारच्या कार्यशाळा गांव पातळीवर, शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकरिता व स्थानिक लोकांसाठी आयोजित करण्यात येतील.



*‘बेसिक लाईफ सपोर्ट’ कार्यशाळा*

# साथीच्या आजाराबद्दल महिती, मार्गदर्शन व तपासणी शिबिर



*डॉ. आसावरी मोडक खेड येथे ‘डेंग्यू’विषयी माहिती देताना*



*डॉ. चौहान साथीच्या रोगांबद्दल मार्गदर्शन करताना*

रत्नागिरी जिल्ह्यातील खेड व चिपळूण या तालुक्यातील काही भागामध्ये गेल्या काही दिवसांपासून ‘डेंग्यू’चे रुग्ण तसेच टायफॉईड व कावीळ या आजाराचे रुग्ण आढळून येत असल्यामुळे खेड व चिपळूण नगरपरिषद, कामते ग्रामपंचायत आणि भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाच्या संयुक्त विद्यमाने ‘आरोग्य व रक्त तपासणी आणि साथीच्या आजाराबद्दल माहिती आणि मार्गदर्शन शिबिर’ दि. २९/०५/२०१९ रोजी खेड येथे व दि. २०/०६/२०१९ रोजी कामते जावळेवाडी येथे घेण्यात आले. या वेळी डॉ. रामबदन चौहान यांनी डेंग्यू, टायफॉईड आणि कावीळ यासारख्या रोगांचा प्रतिबंध करण्याविषयीची माहिती दिली. सदर कार्यक्रमाचा व शिबिराचा लाभ मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या खेड, कामते, चिपळूणवासियांनी घेतला. रुग्णालयातर्फे ‘लेप्टो’साठी प्रतिबंधक उपाय म्हणून ‘डॉक्सिसायक्लीन’ औषधाचे वाटप करण्यात आले.

# नांदिवसे येथे महिला बचत गटाची सभा

दि. ४ जून २०१९ रोजी नांदिवसे येथे महिला बचत गटाची सभा झाली. या सभेला उपस्थित राहण्यासाठी भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाला आमंत्रित करण्यात आले होते. भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाच्या वतीने रूपाली चव्हाण, वैद्यकीय मानसशास्त्रज्ञ या सभेला उपस्थित होत्या. त्यांनी भ.क.ल.वालावलकर रुग्णालयात



*नांदिवसे येथे महिला बचत गटाच्या सभेत डॉ. रुपाली चव्हाण माहिती देताना*

उपलब्ध असलेल्या विविध सोयीसुविधा व योजनांची माहिती दिली व रुग्णालयाशी संबंधित प्रश्नांची उत्तरे दिली. त्याचबरोबर गर्भधारणेदरम्यान घ्यायची काळजी, गर्भधारणेदरम्यान असलेल्या जोखमा याची माहिती सांगितली. 'महिलांमधल्या कर्करोगाची पूर्व लक्षणे' याही विषयावर त्यांनी उपस्थितांना माहिती दिली.

## हेदवी ग्रामसभा व पालक मेळावा

दि. ३ जून २०१९ रोजी हेदवी ग्रामपंचायत येथे ग्रामसभा आणि पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत ग्रामपंचायत सदस्य, स्थानिक गावकरी आणि महिला बचत गटातील महिला व पालक उपस्थित होते. वैद्यकीय संचालिका डॉ. सुवर्णा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला भ.क.ल.वालावलकर रुग्णालयाची कम्युनिटी टीमदेखील उपस्थित होती. डॉ. सुवर्णा पाटील यांनी सभेला संबोधित करताना रुग्णालयात उपलब्ध असलेल्या विविध सोयीसुविधांची व योजनांची माहिती दिली. त्यांनी उपस्थितांच्या प्रश्नांची उत्तरे दिली व त्यांच्या शंकांचे निराकरण केले, त्याचबरोबर चांगले आरोग्य म्हणजे काय आणि ते कसे प्राप्त करावे याबद्दल माहिती दिली.



*हेदवी ग्रामसभा व पालक मेळाव्यात बोलताना डॉ. सुवर्णा पाटील*

## खांडोत्री येथे ग्रामसभा



*खांडोत्री येथे ग्रामसभेत बोलताना डॉ. स्वाती सोनावणे*

दि. ३०/०५/२०१९ रोजी खांडोत्री येथे ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमाला भ.क.ल. वालावलकर रुग्णालयातील विविध योजना व सुविधांची माहिती देण्यासाठी डॉ. स्वाती सोनावणे उपस्थित राहिल्या. खांडोत्रीच्या ग्रामस्थांनी या माहितीने प्रेरित होऊन गावातील किशोरवयीन मुलींना दि. १२ ते १६ जून या पाच दिवसांच्या निवासी शिबिरासाठी पाठवले. या शिबिरात या मुलींची आरोग्य तपासणी आणि त्यांच्या जिव्हाळ्याच्या विषयांवर उपयुक्त मार्गदर्शन करण्यात आले.

## डेरवण प्रशालेत गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

डेरवण येथील 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट' संचालित इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेने शालांत परीक्षेत सातत्याने १२ वर्षे १००% यशाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. यावर्षी इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी समृद्धी देवरूखकर हिने ९८% गुण मिळवून प्रशालेत प्रथम येण्याचा बहुमान प्राप्त केला आहे. मुक्ता कोकाटे हिने ९७.४०% गुण मिळवून द्वितीय तर धार्मिका पटेल आणि ऋचा कोवळे यानी ९७.२०% गुण मिळवत प्रशालेत तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. एकूण प्रविष्ट ४७ विद्यार्थ्यांपैकी २९ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य प्राप्त केले आहे.

इयत्ता बारावी विज्ञान शाखेतील जान्हवी पाटील या विद्यार्थीनीने ८०.६२% गुण मिळवून प्रथम क्रमांक प्राप्त केला आहे. हरिओम वाबळे याने ७७.८५% व धर्मेंद्र राठोड याने ७४.७७% गुण मिळवत प्रशालेत द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त केले.

संस्थेच्यावतीने विद्यार्थी गुणगौरव समारंभ आयोजित करून गुणवंत विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांना रोख पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कौतुक सोहळ्याला ज्येष्ठ वैद्यकीय व्यावसायिक डॉ. मधुकर जोशी प्रमुख पाहुणे म्हणून लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेच्या संचालिका शरयू यशवंतराव यांनी केले.




*इयत्ता दहावीत ९८% गुण मिळवून शाळेत प्रथम आलेली विद्यार्थिनी समृद्धी देवरूखकर हिचा गौरव करताना प्रमुख पाहुणे डॉ. मधुकर जोशी.*

माध्यमिक शालांत परीक्षेत प्रशालेत मुलींमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त समृध्दी देवरूखकर हिला 'सावित्रीबाई दत्तात्रेय देसाई' पारितोषिक रु.३०००/-, 'सुशिला हरिहर काळे' पारितोषिक रु.१०००/- व 'डॉ.परिणिता मदन' पारितोषिक रु.१५००/- ने गौरविण्यात आले. तसेच मुलांमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थी विक्रांत कुसुमडे याला 'सावित्रीबाई दत्तात्रेय देसाई' पारितोषिक रु.३०००/- व 'हरिहर दिनकर काळे' पारितोषिक रु.१०००/- ने गौरविण्यात आले.

शाळेत द्वितीय क्रमांक प्राप्त मुक्ता कोकाटे हिला 'गोविंद वामन पटवर्धन' पारितोषिक रु.२१००/- तसेच संस्कृतमध्ये १०० पैकी १०० गुण मिळविल्याबद्दल 'गोविंद भास्कर मुळे' पारितोषिक रु.३०००/- व 'डॉ. विमल नारायण भिडे' पारितोषिक रु.२०००/- ने गौरविण्यात आले.

गणितात १०० पैकी १०० गुण मिळविणाऱ्या चार विद्यार्थिनी समृद्धी देवरूखकर, ऋचा कोवळे, धार्मिका पटेल व मुक्ता कोकाटे यांना 'गोविंद भास्कर मुळे' पारितोषिक रु.३०००/- व 'डॉ. विमल नारायण भिडे' पारितोषिक रु.२०००/- ने गौरविण्यात आले.

मराठी विषयात प्रथम आलेल्या वेदिका नेरूळकर हिला 'गोविंद भास्कर मुळे' पारितोषिक रु.३०००/- ने गौरविण्यात आले. इंग्रजीसाठी ऋचा कोवळे व समृद्धी देवरूखकर यांना तसेच सामाजिक शास्त्र विषयासाठी मुक्ता कोकाटे हिला 'अरविंद गंगाधर सरदेसाई' पारितोषिक रु.१०००/- ने गौरविण्यात आले. विज्ञान व तंत्रज्ञान विषयासाठी धार्मिका पटेल व हिंदीसाठी विक्रांत कुसुमडे याला पारितोषिक रु.१०००/- ने गौरविण्यात आले.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेत विद्यालयातून मुलींमध्ये प्रथम आलेली विद्यार्थिनी जान्हवी पाटील व मुलांमध्ये प्रथम क्रमांक प्राप्त विद्यार्थी हरिओम वाबळे यांना 'डॉ. विमल नारायण भिडे' पारितोषिक रु.२०००/- ने गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगताद्वारे शाळेबद्दल कृतज्ञता व सत्काराबद्दल आभार व्यक्त केले.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ. मधुकर जोशी यांनी आपल्या अभिभाषणात विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन केले. ते म्हणाले, "डेरवण विद्यालयाचे अभिनंदन करतो, कारण या शाळेने सातत्याने १००% निकालाची परंपरा राखली आहे, तसेच संस्कृतमध्ये १०० पैकी १०० व गणितात ४-४ विद्यार्थिनींनी १०० पैकी १०० गुण मिळविले आहेत. हे सर्व विधिलिखित असतं असं मला वाटतं. वालावलकर रुग्णालयाची सुरुवात झाली तेव्हा पासून या सर्व संस्थांचा मी साक्षीदार आहे."

२० वर्षांपूर्वी इंग्रजी माध्यमाची शाळा काढली तेव्हा शंका उपस्थित केली गेली की, एवढ्या ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाची शाळा चालेल का? मी नेहमी म्हणतो - जसे फुलपाखराला मध कुठे आहे ते कळते तसेच चांगल्या पालकाला चांगली शाळा कुठे आहे ते कळते. या शाळेत संगमेश्वरहून २-२ गाड्या बदलून मुले येतात कारण येथे दैवी कृपा आहे आणि दुसरे या संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे इथे संस्कार आहेत. शिक्षण सगळीकडेच मिळते पण संस्कार या डेरवणच्या शाळेतच मिळतात असे मला अभिमानाने सांगावेसे वाटते!

आत्ताच शाळा पाहून आलो. येथे नुसताच पुस्तकातला कीडा असलेले विद्यार्थी नाहीत. इथे 'अटल लॅब'मध्ये विद्यार्थी ड्रोन बनवीत आहेत. इतक्या ग्रामीण भागात विद्यार्थ्यांना नवोपक्रमाची संधी मिळते आहे. नुकतीच विद्यार्थ्यांनी भाषणे केली, त्यांचे कौतुक वाटले. शिक्षकांबद्दलची कृतज्ञता, त्यांचे मार्गदर्शन याबद्दल आपल्या भावना व्यक्त केल्या, यातून त्यांची धिटाई दिसली. विद्यार्थी मित्रांनो, तुम्हाला जेव्हा शिक्षक विविध कार्यक्रमात भाग घ्यायला सांगतील तेव्हा कटाक्षाने सहभागी होऊन पुढे गेले पाहिजे. या वयात या गोष्टी केल्या नाहीत तर पुढे होत नाहीत. शब्द मांडणी, विचार सुचणे, सभाधीटपणा, सगळे कठीण जाते, म्हणून शाळेच्या सर्व उपक्रमात भाग घ्या.

पालकांना एक विनंती आहे - मुलांच्या टक्केवारीवर हुरळून जाऊ नका. तसेच मुलाचा कल कुठे आहे ते बघा, तसे त्याला शिक्षण द्या. माणसाचे प्राक्तन, त्याची कष्ट करण्याची तयारी या सर्वांवर व्यक्तीचे भवितव्य अवलंबून असते त्याचा पालकांनी विचार करावा. शाळेला उत्तरोत्तर असेच यश मिळो अशी इच्छा व्यक्त करत त्यांनी पुन्हा एकदा यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमाला प्रमुख विश्वस्त श्री. अशोकराव जोशी, विश्वस्त बाळासाहेब काजरेकर, इतर मान्यवर तसेच पालक, शिक्षकवृंद आणि विद्यार्थी उपस्थित होते. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे 'श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट'चे विश्वस्त, शाळेच्या संचालिका, मुख्याध्यापिका, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालकांनी अभिनंदन केले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत डेरवण इंग्रजी शाळेचे यश

डेरवण येथील श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेने शासकीय शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश संपादन केले आहे. ह्या शाळेचा पूर्व उच्च प्राथमिक स्तर इ. ५ वीचा निकाल ८४% व पूर्व माध्यमिक स्तर इ. ८ वीचा निकाल १००% लागला असून पूर्व उच्च प्राथमिक स्तरातून सहा व पूर्व माध्यमिक स्तरातून चौदा विद्यार्थी शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत चमकले आहेत.

**गुणवत्ता यादीतील विद्यार्थी –**

*पूर्व उच्च प्राथमिक स्तर (कंसात जिल्हा गुणवत्ता यादीतील क्रमांक)–* तन्मय भंडारी (४), हर्षीत माने (३०), गौरी पाटील (६८), श्रावणी राजेशिर्के (९२), वेद वारे (११०), तन्वी भोजने (१११).

*पूर्व माध्यमिक स्तर (कंसात जिल्हा गुणवत्ता यादीतील क्रमांक)–* राजसी माने (३), राज्यात ११ वा क्रमांक, आदित्य बिराजदार (८), श्रुती नेटके (१७), रिया धामणसकर (२९), साक्षी अग्रवाल (५६), दिक्षा तेंटाबे (५९), श्रेयश बोकडे (७१), श्रीतेज गावडे (८७), आयुष कदम (८९), तनुजा जाधव (९९), वंशिका पटेल (१३३), *(कंसात तालुका गुणवत्ता यादीतील क्रमांक)* – तनिष्का उपरे (२), सृष्टी उत्तरे (५), अनुजा गावणंग (९)

या विद्यार्थ्यांनी केवळ शाळेतील शिष्यवृत्ती मार्गदर्शन वर्गातील नियमित अभ्यास व सराव परीक्षा याचा लाभ घेऊन हे सुयश प्राप्त केले आहे. विद्यार्थ्यांना प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका उज्वला जुन्नरकर, कविता अवघडे, गितांजली परब, अश्विनी भागवत, गंधरेखा बारपाटे, जान्हवी चाळके, अनन्या जोगळेकर, वृषाली वरवाटकर यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त तसेच शाळा संचालिका शरयू यशवंतराव, मुख्याध्यापिका प्रज्ञा पारकर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.




*मुलांमध्ये प्रथम आलेला विद्यार्थी विक्रांत कुसुमडे याचा गौरव करताना*

# मैदानी खेळांच्या प्रशिक्षण शिबिराची यशस्वी सांगता

क्रीडासंकुलात भरविण्यात आलेल्या विविध मैदानी खेळांच्या प्रशिक्षण शिबिरांची सांगता 'कासेगाव इंग्लिश स्कूल, साखराळे' यांच्या शिबिराने झाली. हे शिबिर दि. २९ मे २०१९ ते ९ जून २०१९ या काळात घेण्यात आले. कोल्हापूर जिल्ह्यातील 'कासेगाव एज्युकेशन सोसायटी, इस्लामपूर'च्या या शाळेचे क्रीडासंकुलातील प्रशिक्षण शिबिराचे हे सलग तिसरे वर्ष आहे. हे शिबिर महाराष्ट्राचे राज्य क्रीडा मार्गदर्शक तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील अनुभवी प्रशिक्षक सुभाष पवार तसेच शिंदे सर यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आले. या शिबिरात ५० मुले सहभागी झाली. यामध्ये धावणे, थाळीफेक, गोळाफेक, भालाफेक, लांब–उडी, उंच–उडी या प्रकारांचे प्रशिक्षण पुरविण्यात आले. या प्रशिक्षण शिबिरात पंढरपूर येथील खेळाडूंनीसुद्धा सहभाग नोंदविला. क्रीडासंकुलातील सुविधा तसेच वातावरण आम्हाला नेहमीच प्रेरणादायी तसेच पूरक असल्याचे मनोगत खेळाडूंनी या वेळी व्यक्त केले. तसेच या प्रसन्न वातावरणात झालेल्या सरावामुळे विद्यार्थी येणाऱ्या स्पर्धांमध्ये नक्कीच भरभरून यश मिळवतील असे मत प्रशिक्षकांनी व्यक्त केले. व महाराष्ट्रातील अधिकाधिक खेळाडूंनी या संकुलाचा फायदा घ्यावा असे आवाहनही केले.




*शाळेबद्दल आपले मनोगत व्यक्त करताना एक विद्यार्थिनी*




*प्रमुख पाहुणे डॉ. मधुकर जोशी विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन करताना*




*कौतुकसोहळ्याला उपस्थित विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि पाहुणे*




*मुलांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचाही सत्कार*




*शिष्यवृत्ती मिळविणारे विद्यार्थी आपल्या मार्गदर्शक शिक्षकांसमवेत*




सर्व गोष्टींनी समृद्ध असणाऱ्या, असे कोंदणात हिऱ्याला कलाभूनी शोभा यावी अशी वालावलकर ट्रस्टची डेरवण येथील शाळा. अशा स्वच्छंदी शाळेत आमच्या रूचाला प्रवेश घेतला. आम्ही घरी संस्काराच्या, मायेचा हात फिरवत होतो आणि शाळेतील शिक्षक तिच्यात जिद्द आणि आत्मविश्वास निर्माण करीत होते.

S.S.C. परीक्षेत ९५.२० % गुण मिळवून रूचाने यश मिळविले. तिला मिळालेले यश हे तिचे प्रयत्न व तिच्या शाळेतील सर्व शिक्षकांनी घेतलेली अपार मेहनत याचे फळ आहे.

आम्ही पालक तिला फक्त येणाऱ्या अडचणींवर जिद्दीने मात करून अभ्यासाची पूजा करण्यास सांगत होतो. शाळेने शिक्षक-पालक सभा आयोजित करून पालकांना दिशा दाखवली. शिक्ष रूचाने प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव केला त्यामुळे लेखनाचा वेग वाढला व आत्मविश्वास निर्माण झाला शिक्षकांच्या मदतीने रूचाने सर्व उपक्रमांत सहभागी होवून प्रगती केली व यश मिळविले. आजच्या स्पर्धेच्या युगात तरुन जाण्यासाठी या ज्ञानमंदिराने मोलाचा हातभार लावला.

श्री व सौ. मानसी समीर कोवळे



समृद्धी पर्शराम देवरुखकर,पालकांचे मनोगत - Rea

समृद्धी पर्शराम देवरुखकर ही माझी मोठी मुलगी.यंदा दहावीत ९८%गुण मिळवलेत.लहान अनामेय.हा यंदा ८वीत.दोन्हीही मुलांना अगदी ज्युनिअर के.जी पासून डेरवण येथील S.V.J.C.T'sइंग्लिश मेडियम शाळेत घातले.दोन्ही मुलांना त्यांची तयारी करून दररोज न चुकता शाळेत पाठवणे यात कधी खंड पडला नाही.मी स्वतः,माझे वडील,बहिण प्राथमिक शिक्षक.त्यामुळे घरी शैक्षणिक वातावरण.सुरवातीला समृद्धीची आई तिचा अभ्यास घ्यायची.मात्र पाचवी पासून समृद्धीला कोणाची शिकवणीची गरज भासली नाही.स्वतःच अभ्यास करत राहिली.कधीही शाळेतील प्रथम क्रमांक सोडला नाही.शाळेतील शिक्षक वर्ग खूप मेहनत घेतात.मुलांना विविध उपक्रमात गुंतून ठेवतात.त्यामुळे बराचसा सराव शाळेतच होत होता.

माझी दोन्हीही मुले तशी हुशारच आहेत.त्यामुळे म्हणा किंवा आमचे संस्कार म्हणा,अभ्यासाव्यतिरिक्त कोणत्याच गोष्टीचा कधीच हट्ट आमच्याजवळ केलेला नाही.मुले फक्त हुशार असणे महत्वाचे नाही.हुशारीबरोबर चांगले आचारविचार,मोठ्यांचा तसेच गुरुजनांचा आदर,त्यांचेविषयी विनम्रता,शालीनता आदि गुणांची आवश्यकता असतेच.मला अभिमान आहे की समृद्धी स्वतः सद्गुणी आहेच पण तिच्यामुळे अनामेयवरही(माझा छोटा मुलगा)तिची छाप पडलेली पाहायला मिळते.तिला ९८%गुण मिळाले हे अशा गुणांच्या आचरणांचा आणि सातत्याने केलेल्या सरावाचा परिपाक आहे.

पालकांच्या मेहनतीबरोबर शाळेतील सुयोग्य पोषक वातावरण,आवश्यक सुविधा,संधींची उपलब्धता,आणि अतीव परिश्रमाने अध्यापन करणारे सर्व शिक्षक,मुख्याध्यापक,संस्था यांचा या यशामागे सिंहाचा वाटा आहे हे नम्रपणे सांगावेसे वाटते.पुन्हा एकदा सर्व गुरुजनांना अभिवादन करतो.नि थांबतो.

पर्शराम रमाकांत देवरुखकर.
प्रा.शिक्षक.(B.A.B.ED.)
सावर्डे,चिपळूण,रत्नागिरी
संपर्क:-8830935188/8888052288

*पालकांचा अभिप्राय*

## भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र

श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

### पुणे व मुंबई येथून जुलै २०१९ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो.) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| ७ जुलै | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार |
| ७ जुलै | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (मानसोपचार तज्ज्ञ) | मानसोपचार |
| १३ जुलै | डॉ. सतेज सबनिस, मुंबई (युरॉलॉजिस्ट) | मुतखड्यावरील दुर्बिणीद्वारे शस्त्रक्रिया |
| १४ जुलै | डॉ. शिवप्रसाद दाते, मुंबई (सर्जन) | भाजलेले व्रण, डाग - शस्त्रक्रिया व उपचार |
| २० जुलै | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कर्करोग शस्त्रक्रिया व उपचार |
| २० जुलै | डॉ. श्रीपाद बाणावली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार |
| २० जुलै | डॉ. आनंद जोशी, मुंबई (गॅस्ट्रोएंट्रोलॉजीस्ट) | पचनसंस्थेवरील तपासणी व उपचार |
| २० जुलै | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथीक)<br>सकाळी १०.०० ते १.०० वालावलकर रुग्णालयात<br>सायंकाळी ५.०० ते ८.०० UHTC चिपळूण येथे | त्वचारोग तज्ज्ञ |
| २० जुलै | डॉ. संजय ओक, मुंबई (सर्जन) | लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया |
| २० जुलै | डॉ. अनिरूध्द कुलकर्णी, मुंबई (रेडीऑलॉजीस्ट) | इंटरव्हेंशनल रेडीऑलॉजी तपासणी व उपचार |
| २० जुलै | डॉ. भावेश पोपट, मुंबई (रेडीऑलॉजीस्ट) | इंटरव्हेंशनल रेडीऑलॉजी तपासणी व उपचार |
| २० जुलै | डॉ. सचिन विलेकर, मुंबई (डायबेटीक तज्ज्ञ) | 'डायबेटीक-फूट' तपासणी व उपचार |
| २१ जुलै | डॉ. बिंदा जैन, मुंबई (पिडियाट्रिक नेफ्रॉलॉजिस्ट) | लहान मुलांच्या किडनीआजारावरील उपचार |
| २१ जुलै | डॉ. पुनीत छाजेड, मुंबई (पिडियाट्रिक नेफ्रॉलॉजिस्ट) | लहान मुलांच्या किडनीआजारावरील उपचार |

**- डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
**- आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना श्रवण यंत्र (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**
- प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व तिसऱ्या शनिवारी 'वाचा-उच्चार तज्ज्ञ' डॉ. विशाखा या वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.

२ जुलै - संगमेश्वर तालुका सरपंच मेळावा - पंचयत समिती, देवरुख येथे,
४ जुलै - दापोली तालुका सरपंच मेळावा - पंचयत समिती, दापोली येथे,
१९ जुलै - चिपळूण तालुका सरपंच मेळावा - वालावलकर रुग्णालय येथे,
२५ जुलै - डोहाळेजेवण व सासू सून मेळावा RHTC व वालावलकर रुग्णालय येथे,
२८ जुलै - RHTC व वालावलकर रुग्णालय यांच्यातर्फे मुलांचे 'अर्धवार्षिक वाढदिवस'

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले. । Visit us at https://swamisamarth.com/dervan/
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील-९९२१२ ५१६९५, **संपादक मंडळ :** सौ. शरयू यशवंतराव-९८८१६ १९९७४, श्री. श्रीकांत पराडकर-९५८८४ ७९२२०